# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.१२७२/२१/अ.क्र.४४३/२५/०१

**श्री. भैरवनाथ केशव घोडके**
३०७, सी विंग, सिध्दि विनायक को.हौ. सो.लि.,
९० फिट रोड, कामराज हायस्कूलजवळ,
भालाजीनगर, धारावी, मुंबई -४०० ०१७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. आर/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भू.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) प.उ. परि-७**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भू.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०७.२०२० | - | २४.०८.२०२० | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०७.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "W-३५६ कार्यसंकेतांर्गत आर/दक्षिण विभागामध्ये करण्यात आलेल्या सी.सी. रोड कामासंबंधित मुद्देनिहाय माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतीसाद दिलेला नाही.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. २४.०८.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदींतील कलम १९(१) चे जाणिवपूर्वक उल्लघंन करण्यात आलेले आहे. माहिती नि:शुल्क द्यावी. तसेच वारंवार पाठपुरावा करुनही माहिती देण्यास टाळाटाळ केल्याची शंका आहे", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नसून आदेश पारित केले नाही.

तद्नंतर अपीलार्थी यांनी .२माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. ०८.०२.२०२१ रोजी "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या तुरतुदीतील कलम ७ (१) चे उल्लघंन केले आहे. आजमितीस सदरबाबत पत्रव्यवहार निरंक आहे. कलम १९ (१) अन्वये कारवाई निरंक आहे. कलम १९ (८) (ख) २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्यात यावी", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी असे विशद केले की,त्यांना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. आर/दक्षिण विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

उपलब्ध अभिलेखावरून असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. आर/दक्षिण विभाग यांनी अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीकरिता कोणताही प्रतीसाद दिलेला नाही.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेले जोडपत्र-अ व ब हे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या कालावधीत सादर केले असल्यामुळे यावर कोणतीही प्रक्रिया होऊ शकली नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही शासकीय निधी, व त्याचा विनियोग यांचेशी संबंधित असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४(१) अन्वये उघड करणे बंधनकारक आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांचा प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. आर/दक्षिण विभाग यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २(च) नुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्यात यावी. तसेच सदर माहिती सॉफट कॉपीमध्ये उपलब्ध असल्यास तर अपीलार्थी यांना सॉफट कॉपीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Maharashtra